**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १६७/२००४</u>**
**<u>निशाणी १६९ खालील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ ने वादींनी दि. २२/०९/२०२० रोजी न्यायालयात दाखल केलेला दुरूस्त दावा कायदेशीर नसल्याने वादीचा दावा बंद करून अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र. १ चे थोडक्यात कथन असे आहे की, वादीने सदरचा दावा, दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप करून स्वतंत्र ताबा मिळणेकरीता दाखल केला आहे. वादीने दि. ०४/०२/२०२० रोजी नि.क्र.१५७ अन्वये दावा दुरूस्तीचाअर्ज दिला होता. प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टाने मंजुर केल्यानंतर वादीतर्फे दि. २२/०९/२०२० रोजी नवीन दुरूस्ती दावा दाखल करण्यात आला. प्रस्तुत दाव्यावर एकाही वादीची सही नाही. त्यामुळे वादीतर्फे दि. २२/०९/२०२० रोजी दाखल करण्यात आलेला दुरूस्ती दावा कायदेशीर तुरतुदीप्रमाणे टेनेबल नसल्याने वादीचा दावा बंद करण्याचा (स्ट्रक ऑफ) आदेश करण्याची विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत अर्जास वादीने म्हणणे नि.क्र.१७४ अन्वये दाखल केले असुन वादीचे थोडक्यात कथन असे की, वादीने दाखल केलेला दुरूस्ती अर्ज मा. कोर्टाने मंजुर केला आहे. प्रस्तुतच्या आदेशास प्रतिवादीने आव्हानित केलेले नाही. त्यामुळे प्रतिवादीने वादींच्या सहया बाबत घेतलेली हरकत दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १२(१) अन्वये टेनेबल नाही. तसेच दुरूस्ती दावा हा मुळ दाव्याची सत्यप्रत असल्यामुळे त्यावर वादींनी सहया करणे बंधनकारक नाही. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादीने केवळ दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकण्याच्या उद्येशाने दाखल केलेला आहे. करीता प्रतिवादी क्र. १ चा अर्ज खर्चासह खारीज करण्याची विनंती केलेली आहे.

४. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला. पुढील मुद्ये उपस्थित होतात त्यांचेवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवित आहे :—

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्ज मंजुर करण्यास पात्र आहे काय ? | ...नकारार्थी |
| २) | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**मुद्दा क्र. १ करीता :—**

५. प्रस्तुतचा अर्ज, अर्जावरील म्हणणे, दुरूस्त दावा दि. २२/०९/२०२० चे अवलोकन केले, दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. वादीतर्फे ॲड श्री. सांगोळे यांनी त्यांच्या युक्तीवादापृष्ठर्थ पूढील मा. उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाचा आधार घेतला.

1] ***Dagu s/o. Gangadhar Dongre Vs. Gopinath s/o. Mahadu Thore (D) thr. Lr's & ors. {2019(2) ALL MR 548 HC}***

६. वरील न्यायनिर्णयातील न्याय तत्वांचे बारकाईने अवलोनक केले त्याचप्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १२(१) चे अवलोकन केले असता दुरूस्त दावा हा मुळ दाव्याप्रमाणे असतो. दाव्यामध्ये दुरूस्ती झाल्यास सदर दुरूस्ती ही केवळ दाव्यामध्ये करणे कायदयाने बंधनकारक आहे. दुरूस्त दाव्याची प्रत देण्यात आली नाही तर सदर बाबतीत न्यायालयाने वेगळे आदेश करण्याची आवश्यकता नाही. त्याचप्रमाणे झालेल्या दुरूस्ती अन्वये दुरूस्त दाव्याची प्रत विहित मुदतीत दाखल झाली तर सदर प्रतीवर वादींच्या सहया असणे बंधनकारक नाही. केवळ वादीतर्फे विधिज्ञांची सही असली तरी सदर दुरूस्त प्रतीस कायदेशीर मुल्य प्राप्त होते. वादीने दि. २२/०९/२०२० रोजी दाखल केलेली दाव्याची दुरूस्त प्रत ही <u>नि.क्र.१५७</u> वर झालेल्या आदेशान्वये वादींनी दुरूस्त दाव्याची प्रत दाखल केली आहे. सदर दुरूस्ती दाव्याच्या प्रतीवर वादीच्या विधिज्ञांनी वादींतर्फे सही केलेली आहे. सदरची प्रत ही दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १२(१) अन्वये दाखल आहे व ती कायदेशीर असल्याची बाब सिध्द झाली आहे. वादीतर्फे दाखल करण्यात आलेल्या मा. उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयातील न्यायतत्वे वादीच्या

कथनाशी मिळती जुळती असल्याने वादीस उपयुक्त ठरतात. प्रतिवादीचा अर्ज कायदेशीर नसल्याचे सिध्द झाले आहे. करीता मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ बाबत</u> : —**

**७.** मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदविल्याने वादीचा अर्ज नामंजुर करणे आवश्यक आहे. करीता मुददा क्र. २ चे उत्तराकरीता पुढील आदेश पारीत करीत आहे :

**<u>आ दे श</u>**

**१.** प्रतिवादी क्र. १ चा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

**२.** खर्चाबाबत तुर्त आदेश नाही.

MEENA PRAKASH EKHE
Date: 2022.02.25 14:55:49 +0530

**( मीना प्र. एखे )**
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गेवराई.

दि. २४/०२/२०२२

# **CERTIFICATE**

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | S.D. Shinde. |
| Court | :- | Mrs. M.P. Ekhe,<br>JMFC & CJJD, Georai. |
| Date | :- | 24-02-2022. |
| Judgment signed by the presiding officer on | :- | 24-02-2022. |
| Judgment uploaded on | :- | 25-02-2022. |

Sd/-
(S.D. Shinde)
Stenographer G-3,
CJJD & JMFC Court, Georai.